वापरुन पहाण्यासारखा एक उत्कृष्ट साबण

(जयेंद्र)

[फोन नं. ८५ :तार--सत्यवादी

माधानकारक

युनो सभासदत्वाचा प्रश्न

युनो कचेरी (न्यूयॉर्क) ता. १५- युनोत चीनला प्रतिनिधीत्व देण्याचा प्रश्न मंगळवारपासून सुरु होणाऱ्या असलेल्या युनो आमसभेच्या कार्यक्रम पत्रिकेत समाविष्ट करावा अशी विनन्ती करणारे पत्र भारतीय शिष्टमण्डळाने युनो सरचिटणीसांना पाठविले आहे.

(यु. प्रे. व ए. एफ. पी.)

निमशिरगांवात आज दवाखाना व पोष्टाचे उद्घाटन

कोल्हापूर ता. १५- निमशिरगांव (ता. शिरोळ) येथे राष्ट्रीय विस्तार योजनेतून उभारण्यांत येणारा दवाखाना व नव्यानेच सुरू होणाऱ्या ब्रँच पोष्ट ऑफिसचा उद्घाटन समारंभ जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष श्री. दिनकरराव मुद्राळे, यांच्या अध्यक्षतेखाली श्री. शंकरराव माने यांचे हस्ते उद्या सोमवार ता. १६ रोजी दुपारी ४ वाजता होणार आहे.

नवीन गूळ आला

कोल्हापूर ता. १५- येथें शाहूपुरी बाजार पेठेतील हातकणंगले तालुका सहकारी खरेदी विक्री संघाचे दुकानांत माणकापूर येथील दोन गाडी नवा गूळ विक्रीस आला. चालू हंगामातील शाहूपुरी पेठेंत हा पहिलाच आवक असल्यानें अनेक खरेदीदार माल पाहून जात आहेत.

न्यूयॉर्क कापूस बाजार

(ता. १५-९-१९५७)

आज बाजार बंद

रशिया-अमेरिकेच्या प्रत्यक्ष वाटाघाटीची रशियाची सूचना

(यु. प्रे. व ए. एफ्. पी.)

मास्को ता. १५- रशिया आणि अमेरिका यांचे संबंध सुधारावेत यासाठीं या दोन राष्ट्रादरम्यान प्रत्यक्ष बोलणी व्हावीत अशी सूचना रशियाने केली आहे. येत्या ऑक्टोबरमध्ये दोन राष्ट्रांच्या प्रतिनिधिदरम्यान वॉशिंग्टन येथे आर्थिक, व्यापारी, वैज्ञानिक वगैरे प्रश्नावर प्रत्यक्ष वाटाघाटी व्हाव्यात अशी सूचना करणारे पत्र रशियाने अमेरिकेला धाडले असून ते आज टास वृत्तसंस्थेने प्रसिद्धीस दिले आहे.

परक्या देशाला शस्त्रास्त्रे पाठविण्यास भारताचा विरोध

श्री. कृष्णमेनन यांचे न्यूयार्कला प्रयाण

(यु. प्रें. व ए. एफ्. पी.)

कैरो ता. १५- भारताचे संरक्षण मंत्री व्ही. के. कृष्ण मेनन यांनी [illegible] केले. युनो आमसभेला हजर राहा- [illegible]ल आपल्या मुक्कामांत इजिप्तचे अध्यक्ष [illegible]म आशियांतील परिस्थितीवर चर्चा [illegible]रांशी बोलतांना श्री. मेनन म्हणाले, [illegible]डचणी निर्माण झाल्या आहेत. त्या [illegible]ळण्याच्या प्रयत्नांतील मार्गांत कोणते [illegible]ील असे वाटत नाहीं. " जॉर्डनला [illegible]गती वाढली आहे त्यासंबंधी मतप्रद- [illegible]हि राष्ट्रानें आपल्या राष्ट्राबाहेर शस्त्रे [illegible] आहे. " युनो आमसभेच्या आगामी [illegible] प्रश्न असल्याचेहि त्यांनी सांगितले.